# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी पोर्टल/२०१९/726 दिनांक :- १२/०२/२०१९

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागीय कायर्पालयाचे अधिनस्त सर्व संस्था

विषय :- आपले सरकार डी.बी.टी पोर्टल वरील महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती योजना २०१८-१९

संदर्भ :- १ संचालनालयाचे पत्रा क्रमांक १८/तंशिस/डीबीटी/२०१८/३६० दिनाक ११/१०/२०१८
२. या कार्यालयो पत्र क्रमाक तंशिविकापु/विवि/महाडिबीटी/२०१८/४३६९ दिनांक ११/१०/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग (डी.आय.टी) यांचेकडून आपले सरकार डी.बी.टी पोर्टल (संकेतस्थळ http:mahadbtmahait.gov.in )बनविण्यात आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना (शासन निर्णय भाग-१) (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

**उपरोक्त योजनांसाठी अनेक संस्थानी विद्यार्थ्याकडून ऑन लाईन अर्ज भरुन घेवून ते पडताळणी अभावी संस्थेच्या लॉगीनमध्ये प्रलंबीत आहेत .त्या अनुषंगाने सर्व संस्थाना कळविण्यात येते की त्यांनी संदर्भ क्र २ चे पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार संस्थेच्या लॉगइनमध्ये (क्लार्क व प्राचार्य) प्रलंबीत असलेल्या अर्जाची पडताळणी करुन परिपूर्ण अर्ज पुढे पाठवावेत तसेच अपूर्ण व आवश्यक मूळ कागदपत्रे अपलोड न केलेले अर्ज फेटाळून (Reject) लावावेत. सदरची कार्यवाही प्राधान्याने करुन संस्थेच्या लॉगीनमध्ये एकही ऑन लाईन अर्ज प्रलंबीत रहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच अपूर्ण कागदपत्रामुळे जे अर्ज विद्यार्थ्याना परत पाठविण्यात आलेले आहेत (Sent back)अशा अर्जावर तात्काळ कार्यवाही करावी.**

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे